# वॉक - इन- इंटरव्हयू

अधिष्ठाता, ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनांतर्गत करीता थेट मुलाखतीद्वारे खालील तक्त्यात नमुद केलेल्याप्रमाणे कंत्राटी कामगार भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कंत्राटी कामगाराचे पद | शैक्षणिक अर्हता | एकुण संख्या (कंत्राटी) | बयोमर्यादा | रक्कम (दरमहा निश्चित वेतन ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४) कोणत्याही शाखेतुन पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार (बीए.,बीकॉम, बीएससी व बीपीएमटी त्यावरील उच्च शैक्षणिक अर्हता धारण केलेले उमेदवार)<br>५) एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>६) मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श. प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणीज्य प्रमाणपत्राचे अथवा शासनाने या उददेशासाठी समकक्ष म्हणून घोषीत केले आहे असे अन्य कोणत्याही संस्थेने दिलेली प्रमाणपत्र धारण करीत असेल असा उमेदवार, पदवीधरांस प्राधान्य | ५ | वय वर्षे ३८ पर्यत फक्त (३०.०६. २०२३ रोजी) | १०,०००/- (निश्चित वेतन) |
| २ | शिपाई | ७ वी उत्तीर्ण | २ | वय वर्षे ३८ पर्यत फक्त (३०.०६. २०२३ रोजी) | ६०००/- (निश्चित वेतन) |

## सर्वसाधारण अटी :

१) वरील नमुदप्रमाणे कामगारांच्या संख्येत कमी / जास्त बदल होणारे आहेत.
२) सर्व कामगार निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाकडील पदे नाहीत.
३) एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
४) कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल.
५) अनुभवाची अट नाही.
६) उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

## विशेष सुचना

१) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती तथा आदेश स्विकारण्यापासून १२० दिवसांकरीता देण्यात येतील.
२) सदर नियुक्त्या काम समाधानकारक असल्यास १ दिवसाचा खंड देवून जास्तीत-जास्त ३६४ दिवसांपर्यत चालू ठेवण्यात येतील.
३) उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
४) प्रशासकिय किंवा अन्य कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणालाही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार अधिष्ठाता, ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांना आहे.
५) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ कंत्राटी (करार) नियुक्त्या देण्यात येत असल्याने त्या कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील त्यांवर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.
६) वर नमुद केलेल्याप्रमाणे सर्वांना वेतन निश्चित स्वरुपातील आहे (कंत्राटी वेतन).
७) कामगारांना तीन पाळयांमध्ये डयटी राहील. कामाची वेळ सकाळी ८:०० ते संध्याकाळी ५:००.

८) अर्ज को-या कागदावर करावा व त्यामध्ये अ) ज्या पदासाठी अर्ज करीत आहात त्या पदाचे नांव ब) पुर्ण पत्ता, दुरध्वनी / भ्रमणध्वनी ई-मेल आयडी ड) जन्म दिनांक (शालांत परीक्षा प्रमाणपत्रावरील) इ) शैक्षणिक अर्हता/कोर्स, कोठून उत्तीर्ण केलेत त्या संस्थेचे अथवा विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, गुण, टक्के) कामाचा अनुभव पदनिहाय. वर्ष/महिने मोबदला किती मिळत होता. इ. आदेशानुसार माहिती अर्जात नमुद करावी. अर्जासोबत पारपत्र आकाराचे दोन फोटो, काम केलेल्या बददल अनुभव प्रमाणपत्राच्या प्रती (सांक्षाकीत केलेल्या) यासह भरलेला अर्ज मुलाखतीच्या दिवशी दिनांक २०.०६.२०२३ सकाळी १० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत उमेदवाराने स्वतः महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लेखा कक्ष सर ज.जी.समुह रुग्णालये मुंबई. ४०० ००८ येथे सादर करावेत.

**मुलाखतीचे ठिकाण :**

महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना कार्यालय,
मुख्य इमारत, तळमजला
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह
रुग्णालये, मुंबई. ४०० ००८

**मुलाखतीची वेळ : वॉक इन इंटरव्युह**

सकाळी १० वा. ते दुपारी ०५:०० वा. पर्यत

**अधिष्ठाता**
**सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई**